SUPPLEMENT

TO THE

# BOMBAY GOVERNMENT GAZETTE.

Published by Authority.

THURSDAY, 30TH JANUARY 1862.

## PROCEEDINGS OF THE LEGISLATIVE DEPARTMENT, BOMBAY.

THE following Extract from the Proceedings of His Excellency the Governor of Bombay in Council, assembled for the purpose of making Laws and Regulations, is hereby published for the information of all whom it may concern.

"BOMBAY, WEDNESDAY, 22ND JANUARY 1862.

His Excellency the Honorable SIR GEORGE RUSSELL CLERK, Knight of the Most Exalted Order of the Star of India, and Knight Commander of the Most Honorable Order of the Bath, Governor and President in Council of Bombay, having in accordance with Section 29 of the Act passed in the 24th and 25th years of Her Most Gracious Majesty, Chapter 67, appointed the following Gentlemen to be additional Members of his Council for the purpose of making Laws and Regulations, namely:—

M. R. Westropp, Esq., Acting Advocate General.
W. B. Tristram, Esq.
H. H. the Nawab of Savanoor.
Rustomjee Jamsetjee Jejeebhoy, Esq.
Madhoorow Vittul Vinchoorkur.
Jugunath Sunkurshett, Esq.
Shet Premabhaiee Hemabhaiee.

And His Excellency the Governor having, in accordance with the 35th Section of the said Act, summoned to the first Meeting of His Council for the purpose of making Laws and Regulations the additional Councillors so appointed, as well as the other Members of his Council:

There was present this day—
His Excellency the Governor,
His Excellency Sir W. Mansfield, K.C.B., Commander in Chief,
The Honorable Mr. Reeves,
The Honorable Mr. Frere,
The Honorable the Advocate General,
The Honorable Mr. Tristram,
The Honorable the Nawab of Savanoor,
The Honorable Mr. Rustomjee Jamsetjee Jejeebhoy,
The Honorable Madhoorow Vittul Vinchoorkur,
The Honorable Mr. Jugunath Sunkurshett,
The Honorable Shet Premabhaiee Hemabhaiee,
And the Secretary.

The aforesaid additional Members made the necessary affirmations of office and declaration of allegiance which were ordered to be recorded.

The PRESIDENT spoke as follows:—

"I have called a Council in order to open the Legislative Department in accordance with the Act of Parliament which restores to this Presidency the power of making its Laws and Regulations. The new

form in which this Government will exercise the power consists principally in the appointment of Non-Official Members. Such Members have therefore been appointed, and have now taken their seats. I feel satisfied that the zeal which some of them have at all times manifested for the public good, and the high character borne by the others in the management of their estates and Chiefships will ensure their undertaking these responsibilities with a due sense of their importance.

On the manner in which these duties may be performed, it will depend whether many millions of our subjects enjoy contentment and security, or lead a life of uncertainty and confusion. On the one hand, by over-legislating, you will be liable to keep the people in a state of doubt and alarm. On the other hand, by bearing in mind that none know better to govern themselves individually and parochially, you may be constantly in the course of ameliorating their condition, while safely maintaining Her Majesty's just sway over a contented people. And be assured that your Consultations will lose nothing of safe guidance, by occasionally looking for it in Native discernment.

Although your functions will be improtant, they need not be difficult. The several races subjected to our Laws in this Presidency, and generally throughout India, are not of a restless character, unless rendered restless by misgovernment—and everywhere they have an innate respect for authority, whenever authority is respectable and wise.

You will remember, that you owe to those whom you represent a strict account of the fulfilment of your duties—to a people who reasonably desire your protection of their acknowledged rights, and to live in peace.

An assembly on this scale has naturally a tendency to expand; and, seeing it has pleased Her Majesty's Government to consider that the time has arrived for conferring this privilege on you, it will doubtless, in due time, be enlarged; provided that, in its early exercise, you give proofs of sound judgment and discretion in your views of British Dominion in India.

During a short rule I have endeavoured to see something of all classes. I find those of our Countrymen who, in this wealthy Settlement, are engaged in commerce, enterprising and enlightened as they always are when they have fair play, and the best feeling subsisting between them and the Government. I find the Native Merchant active and prosperous; our many Native Chiefs loyal, and most grateful for the liberal and just measures adopted towards them by the present head of the Government of India; while the agricultural classes are steadily advancing from poverty to better prospects, by means of well-regulated reductions in a land tax which had been exceedingly burdensome. In these favourable circumstances, this Government was transferred to my hands by my lamented Predecessor, whose unprejudiced and single-minded course of administration was such as always serves to improve British India, and to satisfy all classes of its inhabitants. With the aid of my experienced colleagues, I have sought to uphold that system. It will now devolve mainly on your counsel to preserve so satisfactory a condition of affairs in this Presidency.

I have directed the Secretary to lay before you some Bills which appear to me to require your early attention. With these and others which individual members may propose to move, you may find your duties at present more laborious than it is probable that they will be hereafter; for there are a few of our projects of Law to consider which there has not been time in the Legislature entrusted with them in Calcutta. These must of course come back to us. And there are some which I have not transmitted to that Council because I foresaw that they must ultimately be disposed of here."

The President then declared the Meeting to be adjourned until Tuesday next, the 28th of the present month of January.

*By order of His Excellency the Governor of Bombay in Council,*

M. J. SHAW STEWART,

Acting Secretary to the Government.

*Bombay Castle, 22nd January* 1862.

---

कायदे व कानूं करण्यासाठीं बंदेगान आली नवाब मुरतताब हजरत आनेरबल् गवरनर साहेब बाहादूर जंजिरे मुंबइं यांणीं कौन्सिल भरलें होतें त्यावेळीं काम चालविलें त्यांतील खालीं लिहिलेला उतारा सर्वांस जाहीर होण्यासाठीं प्रसिद्ध केला आहे.

मुक्काम मुंबई, बुधवार तारीख २२ माहे ज्यान्युआरी सन १८६२.

नैट आफ् धी मोस्ट एकझाल्टेड् आर्डर आफ् धी स्टार आफ् इंडिया आणि नैट कम्यांडर आफ् धी मोस्ट आनरबल् आर्डर आफ् धी बाथ, आलीज्या आनरबल् सर ज्यार्ज रसल क्लार्क साहेब मुंबईचे गवरनर व कौन्सिलाचे प्रेसिडेंट यांणीं मलिका माआझमाचे कारकीर्दीचे २४ वे व २५ वे वर्षांत ६७ वा च्याप्टर ह्मणून आक्ट ठरला आहे त्याचे २९ वे कलमाअन्वयें कायदे व कानूं करण्यासाठीं खालीं लिहिलेले गृहस्थांस आपले कौन्सिलाचे आडिशनल मेंबर नेमले आहेत. ते वितपशीलः—

मिचल राबर्ट वेस्ट्राप साहेब, आक्टिंग आड्वोकेट जनरल.
विलियम बारिंग्टन ट्रिस्ट्राम साहेब.
आलीज्या नवाब साहेब सावनूर येथील.
रस्तमजी जमसेटजी जीजीभाई साहेब.
राव बाहादूर माधवराव विठ्ठल विंचुरकर.
जगंनाथ शंकरशेट साहेब.
शेट प्रेमाभाई हेमाभाई साहेब.

आणि गवरनर साहेबानीं कायदे व कानूं करण्यासाठीं आपले कौन्सिलाचे पहिले सभेस सदर्हू आक्टाचे ३५ वे कलमा अन्वयें सदर्हू प्रमाणे नेमलेले आडिशनल् कौन्सिलरांस व कौन्सिलाचे इतर मेंबरांस बलावणे केल्यावरून खालीं लिहिल्या प्रमाणे हजर होते.

आलीज्या गवरनर साहेब.
आलीज्या सर विलियम मान्सफील्ड साहेब नेट कम्यांडर आफ धी बाथ, व कमांडर इन् चीफ.
आनरबल् रीव्ज साहेब.
आनरबल् फ्रीयर साहेब.
आनरबल् आड्वोकेट जनरल साहेब.
आनरबल् ट्रिस्ट्राम साहेब.
आनरबल् नवाब साहेब सावनूर येथील.
आनरबल् रस्तमजी जमसेटजी जीजीभाई साहेब.
आनरबल् राव बाहादूर माधवराव विठ्ठल विंचूरकर.
आनरबल् जगंनाथ शंकरशेट साहेब.
आनरबल् शेट प्रेमाभाई हेमाभाई.
आणि सेक्रेटरी साहेब.

सदर्हू आडिशनल् मेंबरानीं हुद्याच्या प्रतिज्ञा व वफादारीचे इकरार करावयाचे ते केल्यानंतर ते प्रतिज्ञापूर्वक लेख व इकरार दफतरांत दाखल करण्या विषयीं हुकूम झाला.

नंतर प्रेसिडेंट साहेबानी खालीं लिहिलेले मजकुराचें संभाषण केलें:—

" कायदे व कानूं करण्याचा अधिकार या प्रेसिडेन्सीस पार्लमेंट सभेचे ज्या आक्टा वरून पुनः मिळाला आहे त्या आक्टा अन्वयें कायदे करण्याचें खातें स्थापण्यासाठीं आम्ही आज कौन्सिल भरलें आहे. जे सरकार चाकरींत नाहींत त्यांची कौन्सिलांत नेमणूक करणे ही गोष्ट सदर्हू अधिकार अमलांत आणण्याचे कामांत मुख्यत्वें करून नवी आहे. त्या प्रमाणे सदर्हू प्रकारचे मेंबर नेमले आहेत आणि ते आतां कौन्सिलांत बसले आहेत. यां पैकीं कित्येकांनीं लोकांचे कल्याणाकडे सर्वदा उत्सुकता दर्शिवली आहे, आणि कित्येकांनीं आपआपले जाहागिरीची व संस्थानाची वहिवाट चांगले रितीने चालविली आहे त्यावरून हें मोठें जबाबदारीचें काम पत्करतेवेळीं त्याचें महत्व ते योग्य रितीनें मनांत आणतील याविषयीं आमची पूर्ण खात्री आहे.

हीं कामें चांगले रितीने झालीं असतां आपले लक्षावधि प्रजेस संतोष व सुख प्राप्त होईल नाहींतर पुढें काय होईल कोण जाणे अशे गोंधळांत त्यांस दिवस काडावे लागतील. पुष्कळच कायदे केले तर लोकांचें चित्त अस्वस्थ राहील. आणि दुसऱ्या पेक्षां ज्यांचा त्यांस बंदोबस्त चांगला ठेवतां येतो ही गोष्ट लक्ष्यांत ठेवून काम चालविलें असतां लोकांची स्थिति सुधारण्याचा मार्ग पडेल आणि संतुष्ट रैयतेवर मलिका माआझमाचा नेक अंमल निर्भयपणें कायम राहील. प्रसंगोपात एतद्देशीय लोकांचा विचार घेतल्याने त्यापासून मसलतींत कांहीं उणेपणा येणार नाहीं अशी आपण खात्री ठेवली पाहिजे.

तुमचीं कामें मोठीं अगत्याचीं आहेत खरी तथापि तीं तुम्हास अवघडच पडावीं असें नाहीं. या प्रेसिडेन्सींतील व बहुतकरून सर्व हिंदुस्थानांतील ज्या ज्या ज्ञातीचे लोकांस इंग्रजी कायदे लागू आहेत ते सर्व लोक धांदली स्वभावाचे आहेत असें नाहीं, राज्यकारभारांत गैरबंदोबस्त झाला असतां मात्र ते तसे होतात आणि अधिकारी इज्जतदार व शाहाणा असला म्हणजे त्याचे मर्जी प्रमाणे वागणे हा त्याचा मूळचा स्वभाव आहे.

ज्या लोकांचें तर्फेत तुम्ही आहां आणि सरकारानें कबूल केलेले आपले हकाचें संरक्षण तुम्हाकडून व्हावें व आपण

सुखानें असावें अशी वाजवी इछा जे लोक ठेवितात त्यांस तुम्ही आपलीं कामें वज्याविल्याचा बरोबर जाब दिला पाहिजे हा गोष्ट तुम्ही ध्यानांत ठेवावी.

आतां कौन्सिलाची जी सभा आहे तिची स्वाभाविक रितीनें म्हटलें म्हणजे वृद्धि झाली पाहिजे. आणि कौन्सिलांत बसण्याचा हक तुह्मास देण्याची आतां वेळ आली असें मलिका माआझमा सरकारचे नजरेस आलें आहे यावरून असें दिसून येतें कीं पुढें योग्य वेळ आला ह्मणजे हा हक बेशक वाढविण्यांत येईल, परंतु असें होणे हें तुमचे हातीं आहे; म्हणजे हिंदुस्थानांतील इंग्रज सरकारचे अमलाविषयीं तुमचे विच्यार पक व शाहाणपणाचे आहेत अशी सदहू हक आतां चालवितांना तुमची वर्तणूक झाली पाहिजे.

आम्ही अमलावर आल्या पासून फार दिवस झाले नाहींत तथापि सर्व ज्ञातीचे लोकां विषयीं कांहीं कांहीं माहिती करून आम्ही घेतली आहे त्यावरून खालीं लिहिल्या प्रमाणें आमचे आढळण्यांत आलें आहे म्हणजे आमचे देशचे लोकांस वाजवी प्रमाणें मोकळीक असली म्हणजे ते जसे नेहेमी सुज्ञ व साहस कामें करणारे असतात त्याच प्रमाणें या सधन शहरांत आमचे देशचे जे लोक उदीम व्यापार करीत आहेत ते सुज्ञ व साहस कामें करणारे आहेत आणि त्यांची व सरकारची परस्पर मनोवृत्ति चांगली आहे आणि या देशचे व्यापारिही उद्योगी व सुखी आहेत आणि या देशांतील बहुत करून सर्व संस्थानिक वफादार आहेत आणि हालींचे गवरनर जनरल साहेबांनी त्यांविषयीं उदारपणें योग्य बंदोबस्त केले आहेत त्यां बद्दल ते त्यांचा मोठा उपकार मानतात आणि जमिनीचे साऱ्याचा दर फारच जरब होता तो चांगली योजना करून कमी केल्यामुळें शेतकीचीं कामें करणारे लोकांचें दरिद्र जाऊन ते चांगले स्थितीस येत चालले आहेत असें आमचे आढळण्यांत आलें आहे. अशा चांगले वेळीं या प्रेसिडेन्सीचा राज्यकारभार चालविण्याचें काम माजी गवरनर साहेबांकडून आमचे हातीं आलें आहे. हिंदुस्थानांतील इंग्रज सरकारचे राज्याची सुधारणूक होऊन सर्व प्रकारचे लोक राजी राहात अशा रितीने ते गवरनर साहेब राज्यकारभार निष्पक्षपातानें व एकनिष्ठेनें चालवीत होते. आणि मोठे माहितगार साहेब आमचे सोबतीस आहेत त्यांचे साह्याने त्याच रितीनें राज्य कारभार चालविण्याची कोशीस आम्ही करीत आहों. या प्रमाणें या प्रेसिडेन्सींत कामकाजाची चांगली स्थिति आहे ती आतां कायम राखणे हें मुख्यत्वें करून तुमचे सला मसलतीवर आहे.

ज्या कायद्याचे मसुद्याविषयीं लौकर विच्यार झाला पाहिजे असें आम्हास वाटतें ते मसुदे तुम्हांपुढें गुजारण्या विषयीं आम्ही सेक्रेटारी साहेबांस फरमाविलें आहे. तुम्हास पुढें बहुत करून जें काम पडेल त्यापेक्षां हालींचें काम कदाचित् भारी पडेल, कारण सेक्रेटारी साहेबांस जे मसुदे गुजारण्याचें फरमाविलें आहे त्यांचा व तुम्हां पैकीं दुसरे मसुदे गुजारवितील त्यांचा तुम्हास आतां विच्यार करणे आहे. कांहीं कायद्याचे मसुदे कलकत्ता येथील कायदे करणार सभेकडे सोंपले होते त्यांचा विच्यार करण्याची फुरसुत त्या सभेस मिळाली नाहीं. यामुळें तेही आपणाकडे परत येतील, आणि कित्येक कायद्यांचे मसुद्यांचा येथेंच शेवटीं निकाल करावा लागेल असें आम्हास पूर्वी समजलें होतें त्या वरून आम्ही ते त्या कौन्सिलाकडे पाठविले नाहींत त्यांचाही विच्यार करणे आहे.

या प्रमाणें संभाषण केल्या नंतर चालते महिन्याची तारीख २८ वी मंगळवार पर्यंत सभा तहकूब म्हणून प्रेसिडेंट साहेबांनी ठरविलें.

बमोजीबे हुकूम बंदीगान आली नवाब मुस्तताब हजरत
आनरबल् गवरनर साहेब बाहादूर दर इजरास कौन्सिल.

मुकाम जंजिरे मुंबई,
तारीख २२ वी माहे ज्यान्युआरी सन १८६२.

**ग्याक्सवेल ज्यान शा स्टुवर्ट साहेब,**
आक्टिंग सेक्रेटारी निसबत सरकार यांची सही.

(True translation)

VENAYEK WASSOODEW,
Oriental Translator to Government.

THE following Extract from the Proceedings of the Council of His Excellency the Governor of Bombay assembled for the purpose of making Laws and Regulations, is published for the information of all whom it may concern :—

TUESDAY, 28TH JANUARY 1862.

The Council of the Governor of Bombay for the purpose of making Laws and Regulations met according to adjournment.

*Present.*

The Honorable Mr. Reeves,
The Honorable Mr. Frere,
The Honorable Mr. Tristram,
The Honorable the Nawab of Savanoor,
The Honorable Mr. Juggonnath Sunkersett,
The Honorable Mr. Rustomjee Jamsetjee Jejeebhoy,
The Honorable Mr. Madhowrow Vittul Vinchoorkur,
And the Secretary.

The Honorable Mr. Reeves, being the Senior Ordinary Member present, took the chair in the absence of the Governor.

The Honorable Mr. Reeves said, that he regretted that Government had not as yet been able to prepare any Bills for submission to the Council. The Rules require that each Bill shall be published for at least a week before it is discussed. The time of the Government has of late been so entirely occupied with the introduction of the various measures of general legislation passed by the Legislative Council of India, that it was found impossible to have any Bills in such a forward state as to be ready for discussion at this meeting. He and his Colleagues, however, had not neglected to give their attention to their new duties, and they hoped to have Bills on the following subjects ready for immediate publication, after which they would be brought before the Council.

1. A Bill for the purpose of subjecting to the Laws and Regulations of this Presidency all lands ceded by His Highness the Guickowar, for the use of our Railways passing through his Dominions.

2. A Bill for repealing Regulation III. of 1829 and Act XV. of 1851, and re-enacting in a single law the useful provisions of those laws, with the view of meeting the provisions of the Penal Code and Code of Criminal Procedure, and securing, if possible, the important object of suppressing the production in the market of Cotton in an unclean state, and checking the practice of packing Cotton falsely.

3. A Bill for empowering Municipal Commissioners, under Act XXVI. of 1850, to expend Municipal Funds on Dispensaries and Schools and other suitable objects.

4. A Bill for the purpose of authorizing Magistrates of the Town and Island of Bombay to appropriate fines imposed and realized by them, for the maintenance of Reformatories. This, as well as such additions as may be thought necessary, it is contemplated to produce as an amendment to the Municipal Act.

In order to give time for these Bills being duly published before the Council sits again, he would adjourn the Council till Saturday the 8th proximo at 1 P. M.

*By order of His Excellency the Governor of Bombay in Council,*

M. J. SHAW STEWART,
Acting Secretary to the Government.

*Bombay Castle, 28th January* 1862.

---

कायदे व कानूं करण्यासाठीं बंदेगान आली नवाब मुस्तताब हजरत आनरबल् गवरनर साहेब बाहादूर जंजिरे मुंबई यांचें कौन्सिल भरलें होतें त्यावेळीं काम चाललें त्यांतील खालीं लिहिलेला उतारा सर्वांस जाहीर होण्यासाठीं प्रसिद्ध केला आहे.

मंगळवार तारीख २८ वी माहे ज्यानुआरी सन १८६२.

कानूं व कायदे करण्यासाठीं मुंबईचे गवरनर साहेबांचे कौन्सिलाची सभा आजच्या दिवसापर्यंत तहकूब केली होती त्या प्रमाणें आज पुनः भरली.

हजर.

आनरबल् रीव्झ साहेब.
आनरबल् फ्रीयर साहेब.
आनरबल् ट्रिस्ट्राम साहेब.
आनरबल् नवाब साहेब सावनूर येथील.
आनरबल् जगंनाथ शंकरशेट साहेब.
आनरबल् रस्तमजी जमसेटजी जीजीभाई साहेब.
राव बाहादूर माधवराव विठ्ठल विंचुरकर.
आणि सेक्रेटारी साहेब.

कौन्सिलाचे आर्डिनरी मेंबर हजर होते त्यांपैकीं आनरबल् रीव्झ साहेब सिनियर असल्यामुळें ते गवरनर साहेब आले नव्हते सबब मेसिडेंट झाले.

नंतर आनरबल् रीव्झ साहेबानीं भाषण केलें तें येणेप्रमाणे :—कौन्सिलांत गुजारण्यासाठीं कायद्याचे मसुदे तयार करण्याची फुरसुत सरकारास झाली नाहीं. कानूंप्रमाणे म्हटलें ह्मणजे कायद्यांचे मसुद्याविषयीं विच्यार होण्यापूर्वी कमींत कमी एक आठवडा अगोदर ते छापून प्रसिद्ध जाले पाहिजेत. इंडियाचे लेजिस्लेटिव कौन्सिलानी सर्व हिंदुस्थानासाठीं कायदे ठरविले आहेत ते चालू करण्याचे कामांत सरकारचा आलीकडे सर्व वेळ गेल्यामुळें आजचे सभेंत विच्यार करण्यासाठीं कायद्याचे मसुदे तयार करण्यास बनलें नाहीं. आह्मी व राज्यकारभार चालविण्याचे कामांत जे साहेब आमचे सोबतीस आहेत त्याणीं या नवीन कामाचा उद्योग चालविला आहे, आणि खालीं लिहिलेले प्रकरणा बाबद कायद्यांचे मसुदे लौकर छांपून प्रसिद्ध करण्यासाठीं तयार होतील अशी आह्मी उमेद ठेवतों. ते छापून प्रसिद्ध झाल्यावर कौन्सिलांत गुजारण्यांत येतील.

१. गायकवाड सरकारचे मुलकांतून आपल्या लोखंडी सडका जातात त्यासाठीं गायकवाड सरकारानीं जमिनी दिल्या आहेत त्या जमिनींस या प्रेसिडेन्सीचे कायदे व कानूं लागू करण्या विषयींचे कायद्याचा मसुदा.

२. सन १८२९ चा ३ रा कायदा व सन १८५१ चा आक्ट १५ वा हे रद्द करून त्यांतील जे ठराव उपयोगी आहेत ते खालीं लिहिलेले कारणासाठीं एकत्र करण्या विषयींचे कायद्याचा मसुदा, ह्मणजे हिंदुस्थानचा अपराध्यांस शिक्षा करण्या विषयीं कायदा व फौजदारी काम चालविण्याचे रितीविषयीं कायदा यांतील ठरावा प्रमाणे होण्यासाठीं आणि साफ नाहीं असा कापूस विकण्यास आणण्याची चाल मोडण्याचा व चांगले जातीचा व वाईट जातीचा कापूस भेळून गठे बांधण्याची चाल बंद करण्याचा मोठा हेतु साधेल तितका साधण्यासाठीं कायद्याचा मसुदा.

३. सन १८५० चे २६ वे आक्टाअन्वयें म्युनिसिपल् फंडांतील म्हणजे शहर सुधारण्याचे ऐवजांतील पैका दवाखान्याकडे व शाळांकडे व इतर योग्य कामाकडे खर्च करण्याचा अधिकार म्युनिसिपल् कमिशनरांस देण्याविषयींचे कायद्याचा मसुदा.

४. मुंबई शहराचे व टापूचे माजिस्ट्रेटानी दंड करून वसूल केले असतील ते सन्मार्गप्रवर्तक उद्योगशाळांचे खर्चास लावण्याचा अधिकार त्या माजिस्ट्रेटांस देण्याविषयींचे कायद्याचा मसुदा. म्युनिसिपल् आक्ट सुधारण्यासाठीं हा मसुदा व दुसरा मजकूर जरूर वाटेल तो गुजारण्याचा इरादा आहे.

कौन्सिल पुनः भरण्यापूर्वी सदर्हू कायद्यांचे मसुदे छापून प्रसिद्ध करण्यास वेळ मिळावा म्हणून येत्या महिन्याची तारीख ८ शनवारचे बारांवर एक वाजे पर्यंत सभा तहकूब असें आम्ही ठरवितों.

बमोजिबे हुकूम बंदीगान आली नवाब मुस्तताब हजरत
आनरबल् गवरनर साहेब बाहादूर दर इजलास कौन्सिल.

मुकाम जंजिरे मुंबई.
तारीख २८ वी माहे ज्यान्युआरी सन १८६२.

म्याक्सवेल ज्यान शा स्ट्युवर्ट साहेब,
आक्टिंग सेक्रेटारी निसबत सरकार यांची सही.

(True translation)
VENAYEK WASSOODEW,
Oriental Translator to Government.

Printed for Government at the BOMBAY EDUCATION SOCIETY'S PRESS, Byculla.